# ‘सूर्यदत्त’ देशात १९ वे, महाराष्ट्रात पहिले

पुणे, ता. ४ : इंडियन इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कतर्फे (आयआयआरएफ) जाहीर करण्यात आलेल्या क्रमवारीत सूर्यदत्त कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, इन्फॉर्मेशन रिसर्च अँड टेक्नॉलॉजीला इंडियन इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कमध्ये देशात १९ वे स्थान, महाराष्ट्रातील बीसीए कॉलेज क्रमवारीत पहिले स्थान मिळाले आहे. ही क्रमवारी नुकतीच एज्युकेशन पोस्ट मासिकात प्रकाशित झाली आहे.

या यशाबद्दल सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

‘आयआयआरएफ’ क्रमवारी तज्ज्ञांच्या सखोल विश्लेषणाच्या आधारे करण्यात येते. ही क्रमवारी भारतातील अतिशय वैविध्यपूर्ण आणि अधिकृत असून, कॉर्पोरेट जगतामध्ये या क्रमावरीला अतिशय महत्त्व आहे. रोजगार क्षमता, शिक्षण-अध्यापन व स्रोत, संशोधन, औद्योगिक उत्पादन व एकीकरण, प्लेसमेंट धोरण व सहकार्य, भविष्यवेधी मार्गदर्शन, बाह्यधारणा व आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन या सात कामगिरीच्या निर्देशांवर आधारित ही क्रमवारी ठरवली जाते, अशी माहिती डॉ. चोरडिया यांनी दिली.